# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- युवकांच्या क्षमतेमुळे भारत लवकरच विकसित होईल, पंतप्रधानांचा विश्वास
- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत यश मिळवण्यासाठी काम करण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं भाजप कार्यकर्त्यांना आवाहन
- राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात यावर्षी अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या होणार दाखल
- प्रयागराज इथं शाही स्नानाने महाकुंभमेळ्याला सुरुवात

आणि

- छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या शाळांध्ये स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल प्रकल्प

****

भारताची युवाशक्ती लवकरच विकसित राष्ट्र निर्माण करेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात युवा नेत्यांशी संवाद साधताना ते काल बोलत होते. भारताची पुढची २५ वर्षं कशी असतील, याचा रोडमॅप युवक तयार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. स्वामी विवेकानंदांचा सर्वात जास्त विश्वास युवकांवर होता, प्रत्येक समस्येवर युवक उत्तर शोधतील, असा त्यांचा विश्वास होता. त्यावर आपलाही ठाम विश्वास असल्याचं मोदी यांनी सांगितलं. देश अनेक क्षेत्रात आपलं लक्ष्य निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण करत असल्याचं त्यांनी नमूद केलं. ते म्हणाले,

***‘‘भारत ने हर परिवार को बँक अकाऊंटसे जोडने का लक्ष्य रखा। आज भारत का करीब करीब हर परिवार बँकिंग सेवा से जुड चुका है। भारत ने गरीब महिलाओं की रसोई को धुयें से मुक्त करने का संकल्प लिया। हमनें दस करोड से अधिक गॅस कनेक्शन देकर इस संकल्प को भी सिद्ध किया। आज कितने ही सेक्टर्स मे भारत अपने लक्ष्यों को तय समय से भी पहले हासिल करके दिखा रहा है।’’***

यावेळी पंतप्रधानांनी स्वामी विवेकानंद यांचं स्मरण केलं. या उपक्रमाद्वारे ज्या सूचना आणि कल्पना तरुण नेत्यांकडून केल्या जातील, त्या राष्ट्रीय धोरणात समाविष्ट केल्या जातील अशी घोषणा त्यांनी केली. एक लाख नव्या तरुण लोकांना राजकारणात आणण्याचा मोदी यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग या कार्यक्रमाला दहा जानेवारीपासून सुरुवात झाली. पंतप्रधान मोदी यांनी देशभरातल्या जवळपास तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधला, तसंच दहा विषयांवरल्या सर्वोत्कृष्ट निबंधांच्या संकलनाचं प्रकाशन केलं.

****

दरम्यान, स्वामी विवेकानंद यांना काल त्यांच्या जंयतीनिमित्त सर्वत्र अभिवादन करण्यात आलं. तसंच राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

****

विधानसभा निवडणुकीत राज्याला अस्थिरतेतून बाहेर काढून एक मजबूत स्थिर सरकार देण्याचं काम जनतेनं केलं, असं प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. प्रदेश भाजपाच्या शिर्डी इथं झालेल्या अधिवेशनात ते काल बोलत होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विरोधी पक्षांना एकही जागा मिळणार नाही असं नियोजन करण्याचं आवाहन त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना यावेळी केलं. महाविकास आघाडी तुटण्याच्या मार्गावर आहे, असं सांगत शहा यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

येत्या तीन चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून, या निवडणुकीतही विधानसभेसारखाच विजय मिळवायचा आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना, केवळ सरकार बदलणं नाही तर समाज बदलणं हे भाजपचं उद्दिष्ट असल्याचं नमूद केलं. विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या जनतेनं शिवशाही स्थापन करण्यासाठी अभूतपूर्व यश दिलं आहे. भाजपच्या आतापर्यंतच्या इतिहासाचं हे सुवर्णशिखर असल्याचं गडकरी म्हणाले.

****

राज्य परिवहन महामंडळ-एस.टी.च्या ताफ्यात या वर्षी अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या दाखल होत असून, याद्वारे राज्याच्या प्रत्येक रस्त्यावर नवी लालपरी धावताना दिसेल, असं प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलं आहे. ते काल ठाणे इथं राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी १७ नव्या गाड्यांचं लोकार्पणही झालं. स्वच्छतेसह सुरक्षित प्रवासाला महत्त्व देत एकूणच परिवहन सेवेचं चित्र बदलण्याचा आराखडा बनवला जात असून टप्प्याटप्प्यानं एसटीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात होईल, असं सरनाईक म्हणाले.

****

पुण्यात होणार असलेल्या विश्व मराठी संमेलनात यंदा प्रथमच श्रीमद्भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, संत तुकारामांची गाथा अशा ग्रंथांवर चर्चा होणार असल्याची घोषणा, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली. रत्नागिरीत सुरू असलेल्या कीर्तनसंध्या उपक्रमाला काल भेट दिल्यानंतर ते बोलत होते. मराठी संस्कृती जगभरात नेण्यासाठी विश्व मराठी संमेलन आयोजित केलं जातं, मात्र या संमेलनाचा पॅटर्न बदलला असून, मराठी संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत नेण्यासाठी या ग्रंथांवर चर्चा करण्याचा निर्णय घेतल्याचं सामंत यांनी सांगितलं.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज तीर्थ इथं आजपासून महाकुंभ मेळा सुरू झाला. आज पौष पौर्णिमेच्या पुण्यकाळात पहिलं शाही स्नान पार पडलं. यासाठी प्रशासनानं सर्व तयारी केली असून, भाविकांना या पर्व काळात शुद्ध हवेचा पुरवठा व्हावा यासाठी विशेष जंगल क्षेत्र विकसित करण्यात आलं आहे. गेल्या दोन वर्षात प्रयागराज शहरात १० ठिकाणी ५५ हजार चौरस मीटरवर ६३ प्रकारची १ लाख २० हजार झाडं लावून हे जंगल विकसित करण्यात आलं आहे.

****

राजमाता जिजाऊ यांच्या ४७२व्या जयंतीनिमित्त काल त्यांना सर्वत्र अभिवादन करण्यात आलं. यानिमित्त त्यांच्या जन्मस्थळी बुलढाणा जिल्ह्याच्या सिंदखेड राजा इथल्या राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात शासकीय महापूजा करण्यात आली. केंद्रीय आयुष आरोग्य आणि कुंटुब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह, राजे लखोजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव यावेळी उपस्थित होते.

यानिमित्त, छत्रपती संभाजीनगर इथं दुचाकी फेरी काढण्यात आली.

बीड शहरात जिजाऊंच्या पुतळ्यास अभिवादनासाठी नागिरक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

परभणी शहरात राजमाता जिजाऊंच्या जन्मोत्सवा निमित्त त्यांच्या जिवनचरित्राचं सामुहिक वाचन, सामुहिक महाआरती करण्यात आली.

जालना शहरात राजमाता जिजाऊ यांची जयंती सर्वपक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्यावतीने उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत निघालेल्या दुचाकी फेरीमध्ये आमदार अर्जुन खोतकर, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यासह महिला आणि युवकांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला.

****

व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयातर्फे स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ जयंती – राष्ट्रीय युवा दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं काल उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम झाला. देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे या अंतर्गत गेल्या नऊ तारखेपासून विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं. संस्थेच्या उद्योजक होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सध्या १७ हजारावर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या संकल्पनेतून मनपाच्या शाळेत स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल हा उपक्रम राबवण्यात येत आहे, याच्या सकारात्मक परिणामांचा वेध घेणारा हा वृत्तांत..

***‘‘या प्रकल्पांतर्गत मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बैठक व्यवस्था, स्मार्ट क्लासरूम, सिंथेटिक टर्फ सह क्रीडांगण, आदी भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शाळेत विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवण्यासाठी सावित्री एज्युकेशन कंट्रोल रूम कार्यान्वित करण्यात***

***आली, तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी गुणवत्तेची पंचसूत्री हा प्रकल्प राबवला जात आहे. या विविध उपक्रमांमुळे मनपाच्या सिल्क मिल प्राथमिक शाळेची केंद्र शासनाने PM Shri स्कूल म्हणून तर नारेगाव आणि बनेवाडी इथल्या दोन शाळांची, राज्य शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणून निवड केली आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात मनपाच्या किराडपुरा शाळेला गौरवण्यात आलं आहे.''***

****

खो-खो विश्वचषक स्पर्धेला आजपासून नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी इनडोअर स्टेडिअममध्ये सुरुवात होत आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या पुढाकारानं आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेचं हे पहिलंच वर्ष आहे. भारताच्या पुरुष संघाचं नेतृत्व प्रतीक वायकर तर महिला संघाचं नेतृत्व बीड जिल्ह्यातली प्रियंका इंगळे करत आहे. डीडी स्पोर्टस वाहिनीवरुन रात्री साडे आठ वाजेपासून सामन्याचं थेट प्रक्षेपण पाहता येणार आहे.

****

महिला क्रिकेटमध्ये राजकोट इथं काल झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतानं आयर्लंडवर ११६ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित ५० षटकात पाच बाद ३७० धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना आयर्लंडचा संघ सात खेळाडू गमावत २५४ धावांवर सर्वबाद झाला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत दोन - शून्य अशी विजयी आघाडी घेतली आहे.

****

धाराशिव इथल्या व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयातले प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जयकुमार शामराज यांना भारत सरकारचं पेटंट मंजूर झालं आहे. जलचर प्रजाती नियंत्रण पद्धतीच्या उपकरणासाठी हे पेटंट मंजूर करण्यात आलं. या उपकरणाद्वारे मत्स्यपालानातील पाण्याची गुणवत्ता आणि प्रजातीचं आरोग्य, याचं निरीक्षण करता येतं.

****

चालकानं प्रसंगावधान राखल्यानं अंबाजोगाई तालुक्यात काल बस अपघाताचा मोठा अनर्थ टळला. तालुक्यातल्या पठाण मांडवा घाटात प्रवाशी घेऊन जाणाऱ्या

बसचे ब्रेक निकामी झाले. बस चालक पारजी उबाळे यांनी यावेळी प्रसंगावधान दाखवत बस घाटाच्या कठड्यावर आदळवली. यात ती घाटातल्या झाडांना अडकून अपघात टळला.

****